**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय,**
**संत तुकारामनगर, पिंपरी – ४११०१८.**

## दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपाची (हंगामी) हाऊसमन व रजिस्ट्रार ही पदे भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरिता दरमहा एकत्रित मानधनावर **हाऊसमन व रजिस्ट्रार** ही पदे तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता भरावयाची आहेत. त्यांचे पदनाम, पदसंख्या, नियम/अटी/शर्ती खालीलप्रमाणे नमुद केलेल्या आहेत.

**प्रपत्र 'अ'**

| **हाउसमन** | **मेडीसीन** | **सर्जरी** | **स्त्रीरोग** | **कर्करोग** | **भुलशास्त्र** |
|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | **18** | **09** | **12** | **01** | **06** |
| भरावयाची एकुण पदे - **54** | Sc-2,St-1, OBC-3, VJA-1,NTB-1, NTC-1,open-9 | Sc-1, St-1,OBC-1, VJA-1, Open-5, | Sc-2, St-1, VJA-1, OBC-2 Open-6, | Open-1 | Sc-1, St-1, VJA-1, Open-3 |
| | **कान,नाक, घसा** | **दंतरोग** | **मानसोपचार** | **नेत्ररोग** | **बालरोग** |
| | **01** | **02** | **01** | **01** | **03** |
| | Open-1 | Sc-1, Open-1 | Open-1 | Open-1 | Sc-1, Open-2 |
| **मुलाखत दिनांक** | १४/१०/२०१६ | | | | |

| **रजिस्टार** | **मेडीसीन** | **सर्जरी** | **गायनँक** | **आर्थोपेडिक** | **बालरोग** | **भुलशास्त्र** | **रेडिओलाँजी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | **03** | **03** | **03** | **03** | **03** | **03** | **01** |
| भरावयाची एकुण पदे - **19** | Sc-1, Open-2 | Sc-1, Open-2 | Sc-1, Open-2 | Sc-1, Open-2 | Sc-1, Open-2 | Sc-1, Open-2 | Open--1 |
| **मुलाखत दिनांक** | १४/१०/२०१६ | | | | | | |

**वरील पदांना आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व त्यानुसार द्यावयाचे मानधन खालीलप्रमाणे आहे.**

**प्रपत्र 'ब'**

| **अ. क्र.** | **पदनाम** | **अनुभवानुसार द्यावयाचे मानधन** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **शैक्षणिक पात्रता** | **एम.बी.बी.एस / बी.डी.एस.** | **संबंधित विषयाचा डिप्लोमा** | **संबंधित विषयाची पदवी** |
| १ | **हाउसमन** | एम.बी.बी.एस/डिप्लोमा/ पदवी/ एम.डी./एम.एस./ एम.एम.सी. रजि.अद्यावत असणे आवश्यक. | ४५०००/- | ५००००/- | ५५०००/- |
| २ | **हाउसमन** | बी.डी.एस./ एम.एम.सी. रजि.अद्यावत असणे आवश्यक. | ४५०००/- | -- | -- |
| ३ | **रजिस्टार** | एम.बी.बी.एस./एम.एम.सी. रजि.अद्यावत असणे आवश्यक. व संबंधित विषयाचा डिप्लोमा/MD/MS | -- | ५००००/- | ५५०००/- |

१.मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२. ज्या दिवशी म.न.पास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

३. लेखी परिक्षेस व मुलाखतीस येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

४. उपरोक्त पदांना विहित केलेनुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा केले जाईल. अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निर्दशनात आलेस तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

५. सर्व उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या सत्य प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) सर्टिफिकेट, फोटो, इतर सादर करणे बंधनकारक आहे.

६. निवड केलेल्या उमेदवारांना म.न.पा.ने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणुक रद्द करण्यात येईल.

७. सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

८. रजिस्टार /हाऊसमन वैद्यकिय अधिकारी यांना २४ तास रूग्णालयात राहुन काम करावे लागेल.ज्या युनिटमध्ये किंवा वॉर्डामध्ये नेमणुक होईल त्यांचे अधिपत्याखाली काम करावे लागेल.

**<u>मुख्य अटी खालील प्रमाणे राहतील-</u>**

- उमेदवारांना रूग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.
- उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.
- उमेदवारांना वयाची अट लागु राहणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता नावाखाली दर्शविण्यात आलेल्या दिनांकास यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील चाणक्य प्रशासकीय कार्यालयातील हॉलमध्ये स.१०.०० वाजता आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रतीसह समक्ष उपस्थित रहावे. तसेच आलेल्या इच्छुक उमेदवारांचे रजिस्ट्रेशन सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत केले जाईल. वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या लेखी परीक्षा व मुलाखतीबाबत समक्ष सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर दिवशी आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पद भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview आयोजित केल्या जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

जाहीरात क्र.- ११३
रोटेशन क्र.- ब-१
वेबसाईट – www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/पीजी-१/कावि/१७८३/२०१६
दि.-४/१०/२०१६.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.